# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - सम
- कवी / कवयित्रीचे नाव :- मिलिंद दाते

---

आरंभी ये षड्ज सुस्वर, ऋषभ मागुनि देई साथ
गंधाराच्या पाठीवरती, बसुनि चढवि मध्यम साज

पंचम उभरी उंच गुढी अन घेई हिंदोळे धैवत
आरोहाचा मुकुटमणी जो, निषाद राही सदा चमकत

कोमलकाया असे कुणाची, कुणी मिरविती बिरूद शुध्दीचे
तीव्र करी कुणी भावभावना, व्रतस्थ हो कुणी स्थिरतेचे

अस्तित्वाचा त्याग करोनि, दुसऱ्या देती अढळस्थान
रागांमध्ये मिसळूनी जाती, नसे कुणा वृथा अभिमान

शब्दा करिती अर्थदान अन, साकव होती गीतांचे
मना-मनांचे विणती धागे, साकारुनी गुंजन त्यांचे

हातात घेऊनि हात, गुंफिती सुरेल किती ते नाद
ठाव कधी मनाचा घेती, हृदयास घालती साद

आदि नसे अन् अंत तयांना, नसे किनारा चराचरी
प्रवाह त्यांचा वाही अनाहत, सिद्‌ध होतसे समेवरी

Anahat Music Therapy